**कार्यालयीन उपस्थितीची तपासणी करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.ओएफएम १०/०८/प्र.क्र.४५२/ई
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ०६ नोव्हेंबर २००८

**पहाः शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग समक्रमांक दिनांक १८ ऑगस्ट २००८**

**परिपत्रक**

प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहाण्याविषयी व उशीराने उपस्थित होणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत योग्य ती कारवाई करावी, याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. तथापि, क्षत्रिय स्तरावरील कार्यालयात अधिकारी/कर्मचारी वेळेवर उपस्थित रहात नाहीत, असे निदर्शनास आले आहे. तसेच अधिकारी/कर्मचारी कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांच्या जागेवर नसल्याचेही आढळून आले आहे. त्यामुळे शासकीय कामकाजाचा जलदगतीने निपटारा होत नसल्याने सामान्य जनतेची कामे होत नाहीत. याबाबत जनतेकडून शासनाकडे सतत तक्रारी प्राप्त होत असतात. तरी याबाबत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहेत की, त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात सकाळी वेळेवर उपस्थित राहतात किंवा नाही तसेच ते त्यानंतर त्यांच्या जागेवर असतात किंवा नाही याबाबत तपासणी करण्यासाठी एक दक्षता पथक स्थापन करावे. तसेच उपरोक्त स्थापन करण्यात आलेल्या दक्षता पथकाने प्रत्येक महिन्यात अचानक भेट देऊन उपरोक्त बाबींची तपासणी करावी आणि त्याबाबतचा अहवाल तहसिलदार यांनी उपविभागीय अधिकारी यांना, उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांना आणि जिल्हाधिकारी यांनी त्यांचा अहवाल विभागीय आयुक्त यांना तसेच विभागीय आयुक्त यांनी आपला अहवाल शासनास सादर करावा असे शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक १८ ऑगस्ट २००८ अन्वये कळविण्यात आले आहे.

२. या परिपत्रकाचा पुनरुच्चार करण्यात येत असून परित्रकातील सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ. से.धांडे)
उपसचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
२. त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या नियंत्रणाखालील अधिका-यांच्या निदर्शनास आणावे.
सर्व सहसचिव/उपसचिव (महसूल), महसूल व वन विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:६४५
12 NOV 2008 निवड नस्ती ई शाखा
५४४९३
विशेष नोंद ...
कार्य विवरण नं.:-
13/11
15-11-08
EST - ई प्रति,

क्रमांक/आस्थापना/५/कावि ५४४३३/२००८
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी दि. १५/११/२००८